# ।। मिनखा देह गुण को अंग ।।
## मारवाडी + मराठी
✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

## ।। अथ मिनखा देह गुण को अंग लिखंते ।।

।। कुंडल्यो ।।

लख चोरासी जूण में ।। अेक मिनखा देहि होय ।।
गुण भारी करतार सूं ।। अेसो ब्रम्ह न कोय ।।
अेसो ब्रम्ह न कोय ।। हद बेहद में जोई ।।
अमर लोक जब जाय ।। धरे मिनषा देह कोई ।।
सुखराम ओर किण जूण सूं ।। गर्भ न छूटे कोय ।।
लख चोरांसी जूण मे ।। अेक मिनखा देहि होय ।।१।।

हे मनुष्य शरीर कसे आहे आणि या मनुष्य शरीरात किती भारी गुण आहे,त्याला आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.हे मनुष्य शरीर चौऱ्यांशी लाख योनीतीलच एक आहे,परंतु या मनुष्य देहात खूप भारी गुण आहे.या मनुष्य देहात इतका भारी गुण आहे की,कर्ताराचा देह ही या मनुष्य देहासारखा नाही आहे.हद्दीत आणि बेहद्दीत सर्व देह पाहून घ्या,या मनुष्य देहासारखा दुसरा कोणताही देह नाही आहे.सृष्टीकर्त्याला आपल्या पारब्रम्हच्या देहाने इच्छीले तरीही त्याला परस्पर म्हणजे मनुष्य देहाशिवाय अमरलोकात जाता येत नाही,म्हणून सृष्टी कर्त्याच्या देहा पेक्षाही या मनुष्य देहात मोठा भारी गुण आहे आणि या मनुष्य देहा सारखा आणखी ब्रम्ह म्हणजे देह नाही आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,या मनुष्य देहा शिवाय अन्य कोणत्याही योनीने गर्भात येणे सुटू शकत नाही.।।१।।

कवत ।।

संखज्ञान मत धार ।। समझ नेहचल होय बैठो ।।
तांकी मुक्त न होय ।। आद घर कदे न पैठो ।।
जोग हट्ट दम साझ ।। खेंच पुरब दिस ध्यावे ।।
वे भी लंघे न पार ।। ब्रम्ह को देस न पावे ।।
सेवा तीरथ पुन रे ।। ग्यान ग्रंथ बोहो होय ।।
बिना भजण सुखराम क्हे ।। गर्भ न छूटे कोय ।।२।।

या मनुष्य देहात कोणी सांख्य योगाचे ज्ञान आणि सांख्य योगाचे मत,हृदयात धारण करुन निश्चिंत होऊन बसला,तरीही त्याची मुक्ति होणार नाही.तो आदि घरी म्हणजे सतस्वरुपाच्या घरी जाऊन बसू शकत नाही.त्याचात सांख्य योगाचे ज्ञानावाले हे मनुष्य देह व्यर्थ गमावून देतात व कोणी हटयोगाची साधना करणारा,श्वासाला पूर्व दिशेने खेचून भृगुटीपर्यंत पोहचून जातो,ते ही पार उतरणार नाही.त्यांना सतस्वरुप ब्रह्मचा देश मिळणार नाही,तर हटयोगवालेही देह व्यर्थ गमावतात.हे असे मनुष्य शरीर प्राप्त झाल्यावर ही कोणी सेवा करतो आहे,कोणी तीर्थ करतो,कोणी यज्ञ करतो,कोणी पुण्य करतो,कोणी

 !! राम नाम लो, भाग जगाओ !! राम

वेदाचे ज्ञान ऐकतात आणि ऐकवतात.ज्ञानाचे खुपसे ग्रंथ वाचतात आणि ऐकतात तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे राम नामाचे भजन केल्याशिवाय आपला मनुष्य देह व्यर्थ गमावतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,राम नामाचे भजन केल्याशिवाय कोणाचेही गर्भात येणे सुटत नाही,(भजन केल्या शिवाय सर्व व्यर्थ आहे.)।।२।।

ब्रम्हा को सुण संख ।। जोग शिवजी को होई ।।
नवद्या सबे बिद्यान ।। बिस्न को धरम संजोई ।।
आनदेव बिध पूज ।। गोप मंतर जे सारा ।।
अे सब हद की बात ।। धार नर लंघे न पारा ।।
केवळ सास उंसास मे ।। राम रटयाँ सुं होय ।।
दसवोंद्वार सुखराम क्हे ।। बिना भजण नही कोय ।।३।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हा सांख्ययोग ब्रह्माचा बनविलेला आहे. या सांख्ययोगाची साधना करुन ब्रम्हाच्या लोकात जातील व हठ्योग महादेवाचा आहे,ते हठ्योगाची साधना करणारे महादेवाच्या लोकात जातील आणि नवधा भक्तिची सर्व विधी करुन विष्णूच्या लोकात जातील कारण की,ही नवधा भक्ति विष्णूच्या लोकात जाण्याचा धर्म आहे व दुसरी जी अन्य देवतांची पुजा,दुसरे सर्व गुप्त मंत्र,तर हे सर्व हद्दीच्या आतील गोष्टी आहे,यांना धारण करुन कोणीही पार उतरणार नाही,(सांख्य योगवाले ब्रम्हाच्या लोकात जातील,तर ब्रम्हाचा लोक व ब्रम्हा ही प्रलयात जातील,मग तेथे जाणारे(ब्रम्हाच्या लोकांत)गर्भात आल्याशिवाय कसे राहतील ?अशाप्रकारे हठ्योग साधणारे महादेवाचा लोक कैलासात जातील,तर कैलासही महाप्रलयात मिटून जाईल,महादेवालाही काळ खातो,मग तेथे(कैलासात)जाणाऱ्याचे गर्भात येणे कसे सुटेल?व नवधा भक्ति करुन विष्णूच्या लोकात वैकुंठात जातात,तर वैकुंठही महाप्रलयात मिटेल आणि विष्णुलाही काळ खातो, कारण की जे दिसते त्या सर्वांचा नाश होतो,तर हे ब्रम्हा,विष्णु,महादेव व वैकुंठ,कैलास तसेच ब्रम्हाचा लोक हे सर्व दिसतात,या कारणाने या सर्वांचा नाश होईल,तर मग त्यांचे भक्त तेथे(वैकुंठ,कैलास आणि ब्रम्हाच्या लोकात)जाणारे नाश झाल्याशिवाय राहतील का ?मग हे अन्य दुसरे मंत्र जे आहेत,ते तर हद्दीचेच आहे),तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,यांना धारण करुन कोणीही पार जाऊ शकत नाही,या सर्वांनी मनुष्य शरीर व्यर्थ गमावले,आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,कैवल्य तर श्वासो श्वासात रामनामाचे रटन केल्याने होईल,तर रामनामाचे भजन केल्याशिवाय दहावेद्वार दुसरे काही ही केल्याने उघडत नाही.।।३।।

सकल ग्यान कहे संत ।। मिनख तन धिन धिन होई ।।

सो कारण अेह जाण ।। मोख या बिन नहि कोई ।।
जो उपजे बेराग ।। भक्त हिर्दे जो आवे ।।
सो नर नारी संत ।। ओर परले सब जावे ।।
सुखराम हद बेहद की ।। जो नर करे उपाय ।।
जब लग मिनखा देह को ।। गुण नहि पायो आय ।।४।।

सर्व ज्ञान,सर्व संत सांगतात की,हे मनुष्य शरीर धन्य आहे,धन्य आहे.याला धन्य म्हणण्याचे कारण विचाराल तर,त्याचे हेच कारण आहे की,या मनुष्य शरीरा शिवाय दुसऱ्या देहाने मोक्ष होत नाही,या करीता या मनुष्य देहाला सर्व धन्य म्हणतात.ज्याला वैराग्य उत्पन्न होऊन भक्ती हृदयात आली आहे,ते स्त्री पुरुष सत्त आहेत,बाकी सर्व प्रलयात जातील व जे मनुष्य हद्द-बेहद्दचे उपाय करतात,तोपर्यंत त्यांना मनुष्य देहाच्या गुणाचा परीणाम मिळाला नाही.।।४।।

साखी ।।

सिव धर्म ले मगन हूवा ।। ज्यान दया सु जोय ।।
सुखराम तुरक एकतार रे ।। तीनुं उला होय ।।१।।

शिवधर्मी शिवधर्म घेऊन मनात मग्न होवून गेले आहे.जैनी लोक दया पाळून मनात मग्न राहतात आणि मुसलमान लोक एकतार ठेवतात,तर तिन्ही इकडच्याच गोष्टी आहे.।।१।।

दया धरम इकतार रे ।। अे हद का राह होय ।।
सुखराम मोख को पंथ रे ।। नाम बिना नहिं कोय ।।२।।

हे दया पाळणे,शिवधर्म पाळणे आणि एकतार ठेवणे हे तिन्ही हद्दीच्या आतील मार्ग आहे, आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मोक्षाचा रस्ता तर राम नामाशिवाय दुसरा कोणता नाही.।।२।।

दया सुरग ले जाय ।। धर्म सिव धाम रे ।।
के सुखराम इकतार ।। भेस्त को काम रे ।।३।।

तर हे दया ठेवणे,धर्म पाळणे आणि एकतार ठेवणे हे ही काही खोटे नाही आहे.दया ठेवल्याने,दया ठेवणारे मनुष्य स्वर्गात जातात.शिवाचा धर्म ठेवणारे,महादेवाच्या धामात (कैलासास)जातील आणि एकतार ठेवणारे भेस्तमध्ये जातील.।।३।।

दया पुन इकतार को ।। अे हद का पंथ होय ।।
मोख मिले सुखराम क्हे ।। सो राहा न्यारो जोय ।।४।।

दया,धर्म,एकतार हे सर्व हद्दीचे पंथ आहेत,मोक्ष प्राप्त करण्याचा रस्ता तर यांच्याहून वेगळाच आहे,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.।।४।।

।। इति मिनखा देह गुण को अंग संपूरण ।।